शनिवार १२ जुलै २०२५
छत्रपती संभाजीनगर
पृष्ठे : २० (१२+८)
वर्ष : ४४ अंक : १८२
किंमत : ₹ ५
epaper.lokmat.com
www.lokmat.com
आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ३७७०७/१९८२
महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

# वर्षभरानंतर चिमुकला माता-पित्याच्या कुशीत

## बिहारची वेडसर महिला दोन मुलींसह आली होती नांदेडात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** वर्षभरापूर्वी दोन चिमुकल्या मुलींना घेऊन बाहेर पडलेली महिला वेडसरपणामुळे थेट नांदेडात पोहचली होती. वेडसरपणात नांदेडात फिरताना तिच्या पाच वर्षीय आणि तीन महिन्यांची दोन्ही मुलींचीही ताटातूट झाली. अखेर नांदेड पोलिसांनी या महिलेला शासकीय रुग्णालयात दाखल केले. एनजीओच्या मदतीने येरवडा येथेही तिच्यावर उपचार झाले. अन् आश्चर्य उपचाराला प्रतिसाद देत वेडाच्या भ्रमातून ती बाहेर आली. नंतर एनजीओच्या मदतीने दोन्ही मुलीही परत मिळाल्या अन् पतीही शोधासाठी नांदेडात धडकला.

बिहारमधील बिरबल महतो हे पत्नी आणि दोन चिमुकल्या मुलीसह राहत होते. मागील वर्षी रक्षाबंधनाला त्यांची पत्नी माहेरी जाण्यासाठी घराबाहेर पडली, परंतु नंतर ती बेपत्ता झाली. तिच्यासोबत दोन चिमुकल्या मुलीही होत्या. बिरबल यांनी सर्वत्र तिचा शोध घेतला, परंतु त्या सापडल्या नाहीत. वेडसरपणात ही महिला मुलींना घेऊन नांदेडात पोहचली. मंतादेवी असे या महिलेचे नाव आहे. नांदेडात मिळेल त्या



ठिकाणी खायचे अन् रस्त्याच्या कडेला चिमुकल्या मुलींना घेऊन रात्र काढायची, परंतु दुर्दैवाने तिच्या दोन्ही मुलींचीही ताटातूट झाली. पुढे नांदेड पोलिसांनी उपचारासाठी तिला शासकीय रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणाहून सप्टेंबर २०२४ मध्ये येरवडा येथे दाखल करण्यात आले. आठ महिन्यांनी मंतादेवी यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली. त्यानंतर रायगड येथील एनजीओने श्रद्धा पुनर्वसन केंद्रात टाकण्यात आले. या ठिकाणी काही दिवस राहिल्यानंतर त्यांची स्मृती परत आली. त्यांनी आपल्या दोन्ही मुली नांदेडात हरविल्याचे सांगितले. श्रद्धा फाउंडेशनने पोलिसांच्या मदतीने नांदेडात मुलींचा शोध घेतला. सुदैवाने या दोन्ही मुली शिशुगृहात आढळून आल्या. दोन्ही मुलींना पाहताच मंतादेवींनी हंबरडा फोडला. दुसरीकडे एनजीओने बिहारमधील त्यांच्या पतीशीही संपर्क केला होता.

### महिलेने फोडला हंबरडा

बिरबल महतो रोजंदारी करतात, परंतु जेव्हापासून पत्नी आणि मुली हरविल्या, तेव्हापासून ते त्यांच्या शोधात भटकत होते. नांदेडात शिशुगृहात ज्यावेळी त्यांनी मुलींना पाहिले, तेव्हा त्यांच्या पत्नीच्या आनंदाला पारावार उरला नाही. वर्षभरानंतर त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना मिठी मारली. श्रद्धा फाउंडेशन आणि महाराष्ट्रातील लोकांना ते देवदूतच मानत आहेत, अशी प्रतिक्रिया श्रध्दा फाउंडेशनच्या डॉ. प्रथमेश हेमणानी यांनी दिली.

### नांदेड पोलिसांचे कौतुक

ताटातूट झालेल्या या कुटुंबाची पुन्हा भेट घडवून आणण्यात श्रद्धा फाउंडेशनने महत्त्वाची भूमिका पार पाडली. मंतोदेवीवर उपचार आणि बिरबल महतो यांचा शोध घेतला, तसेच नांदेड पोलिसांची भूमिकाही महत्त्वाची आहे. पोलिसांनी बेवारस सापडलेल्या मुलींच्या नोंदी घेऊन शिशुगृहात पाठविले. त्यामुळे आई आणि बाप मुलींना पुन्हा भेटू शकला.